# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)






16 March 2020 Special Issue- 24 Vol. 2


# CONTRIBUTION OF TOURISM IN NATIONAL DEVELOPMENT ( CTND2020 )


**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editor**
Vice Principal Dr. U.S. Sawant

**Co- Editor's**
Dr. S.S. Shinde
Dr. S.M.Bindge



Scanned with OKEN Scanner

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Special Issue- 24 Vol. 2**

## CONTRIBUTION OF TOURISM IN NATIONAL DEVELOPMENT ( CTND2020 )

**16th MARCH 2020**

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
Vice Principal Dr. U.S. Sawant

**Co- Editor's-**
Dr. S.S. Shinde
Dr. S.M.Bindge

**Shaurya Publication, Latur**



Scanned with OKEN Scanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 24 , Vol. 2<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 24 Vol 2**

**Title of the issue : - CONTRIBUTION OF TOURISM IN NATIONAL DEVELOPMENT ( CTND2020 )**

© All rights reserved with the College & publisher **Price : Rs. 400/-**

**Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Editor**
Vice Principal Dr. U.S. Sawant

**Co- Editor's**
Dr. S.S. Shinde, Dr. S.M.Bindge

**Published BY**

Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**

**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :

16 March 2020

Scanned with OKEN Scanner

19. पर्यटन नियोजनाचे महत्त्व – एक अभ्यास 58
प्रा.डॉ.कोंडेकर आर.एस.

20. तेर - एक गौरवशाली नगर 62
डॉ. राखी सिद्राम सलगर

21. मराठवाड्यातील निवडक पर्यटन स्थळे 64
प्रा.डॉ.एच.टी.सातपुते

22. पर्यटन नियोजन एक अभ्यास 67
डॉ.साईनाथ शेटोड

23. परभणी जिल्ह्यातील ऐतिहासीक पर्यटन आणि वारसा स्थळे 70
प्रा.डॉ.राठोड यु. सी

24. राष्ट्रीय विकासात जगप्रसिध्द अजिंठा लेणींचे योगदान 73
डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे

25. "भारतीय ग्रामीण पर्यटन : एक दृष्टिक्षेप" 79
प्रा.डॉ.बी.एम.कांबळे

26. **अजिंठा डोंगर रांगेतील ऐतिहासिक पर्यटनस्थळे** 81
**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव**

27. "मराठवाड्यातील ज्योतिर्लिंग, धार्मिक पर्यटन स्थळे" 85
डॉ. सौ. संगीता संदीप शिंदे

28. पर्यटन विकासासाठीच्या उपयायोजना व फायदे 87
प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू

29. कृषी पर्यटन : केल्याने देशाटन, मनुजा अंगी चातूर्य येतसे फार 91
प्रो.डॉ. देशमुख एम.व्ही.

30. अहमदनगरमधील सुप्रसिध्द धार्मिक वारसास्थळांचे सामाजविकासातील योगदान 93
श्री.प्रा.डॉ.आर.आर.मुटकुळे , प्रा. नवनाथ काशिनाथ वाव्हळ,

31. "औरंगाबाद : एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ" 99
डॉ. नितीन आहेर

32. 'ऐतिहासिक वारसा व पर्यटन' 101
प्रो.डॉ.दादाराव दत्तराव पानपट्टे

33. पर्यटन विकासात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे योगदान 104
डॉ. आर. एस. पारवे

34. नाट्यकला आणि पर्यटनाचा परस्पर अनुबंध 108
डॉ.वैशाली केशव बोदेले

35. स्थानिक इतिहासात पर्यटनाचे महत्त्व 111
डॉ.विजया साखरे

36. राष्ट्रीय विकासाचा आधार : कृषी पर्यटन 113
डॉ.जीवन सुदामराव गंगणे

37. "मराठवाड्यातील धार्मिक पर्यटन स्थळे" 116
प्रा. डॉ. उत्तम सिताराम कऱ्हाळे



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 24, Vol. 2 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# परभणी जिल्ह्यातील ऐतिहासीक पर्यटन आणि वारसा स्थळे

**प्रा.डॉ.राठोड यु. सी**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, नूतन महाविद्यालय,सेलू जि. परभणी

**प्रस्तावना** -

२१ व्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर दुरगामी परिणाम करणारी क्रिया म्हणजे पर्यटन होय. प्रवास आणि पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असून जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त होतो. प्राचीन काळापासून मानवाचा प्रवास सुरु असून नवीन ठिकाणाचा शोध घेण्याची ईच्छा व प्रवास यांनी मानवी मनास मोहीत केलेले आहे. प्राचीन माणूस अजानतेपणाने प्रवास करीत असे परंतु २१ व्या शतकातील माणुस आवड, कुतूहल व संशोधन म्हणुन प्रवास करतो. भिन्न समाजातील देशातील लोकांचा संपर्क पर्यटनामूळे निर्माण होतो. राष्ट्रीयएकात्मतेस अतिशय पोषक अशी वैचारीक देवानघेवाण पर्यटनामूळे होते तसेच आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढवण्यासाठी मदत होते.

**इतिहास व भुगोल** -

परभणी जिल्ह्यात पुरातत्वीय उत्खनने अद्याप झालेली नाहीत. त्यामूळे प्रागैतिहासीक व इतिहासपुर्वकालीन माहिती उपलब्ध होत नाही. तरी सुध्दा सम्राट अशोकाच्या काळापासून विदर्भाचा सुसंगत इतिहास मिळतो. इ.स. १८५३ पुर्वी मराठवाड्यातील परभणी जिल्हा विदर्भात समाविष्ट होता. इ.स. १८५३ पुर्वीचा कालखंड बराच मोठा आहे.स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९५६ साली मराठवाडा तेव्हाच्या मुंबई राज्यास जोडला होता. त्यापुर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थानात होता.

१ मे १९६२ साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन परभणी जिल्हा हा महाराष्ट्र राज्याचा घटक बनला. परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६५४१ चौ.कि.मी. आहे. लोकसंख्या इ.स. २०११ च्या जणगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या १८३६०८६ इतकी आहे. त्यात पुरुष - ९४२८७० व स्त्री - ८९३२१६ असून त्यात साक्षरतेचे प्रमाण पुरुष ७०.६७ टक्के व स्त्री ८५.०३ टक्के आहे.

दक्षीण गंगा गोदावरी या जिल्ह्यातून वाहते. प्राचीन काळचे प्रभावती हे गाव. येथे प्रभावती देवीचे सुंदर व भव्य मंदिर आहे. परभणी हा प्रभावतीचा अपभ्रंश आहे. परभणी हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या अग्नेय दिशेला येतो.१ मे १९९९ या दिवशी परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन परभणी व हिंगोली असे २ जिल्हे बनले.परभणी हे जिल्ह्याचे मुख्यालये असून त्यात ९ तालुक्याचा समावेश होतो. परभणी, जिंतूर, सेलू, पाथरी, गंगाखेड, पालम, पुर्णा, सोनपेठ व मानवत हे ते तालुके आहेत.

**ऐतिहासीक पर्यटन व वारसा स्थळे** -

महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात पर्यटनाची व ऐतिहासीक दृष्ट्या महत्वाची अशी काही ठिकाणे आहेत. परभणी जिल्ह्यातही अशी काही ठिकाणे आहेतच.

**परभणी** -

हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून येथे मराठवाडा कृषी विद्यापीठ आहे. शेती विषयी निरनिराळी संशोधने व प्रयोग येथे केले जातात. १८ मे १९७२ रोजी कृषी विद्यापिठाची स्थापनाझाली. येथे आकाशवाणीचे केंद्र आहे.दुरदर्शनचे प्रक्षेपण केंद्रही आहे. तसेच दुध डेअरी, सुत गिरणी व तेल-गिरण्याही आहेत. येथे औद्योगिक वसाहत असून अनेक लहान मोठे उद्योग येथे चालतात. सय्यद शहा तुराबुल हक् हा दर्गा येथे असून त्याचा २ फेब्रुवारीला उरुसही भरतो.

सय्यद शहा तुराबूल हक् या नावाचे सुफी पंथाचे एक फकीर होते. विशेष म्हणजे रामदास स्वामीचे ते शिष्य होते.रामदास स्वामीच्या जांब या गावी जात असताना त्यांचे देहावसान झाले.त्यांचे शिष्य तुकाराम माळी परभणीचेच होते. या फकिराच्या दर्ग्याची व्यवस्था माळी कुटूंबाकडे वंश परंपरेने चालू आहे. सय्यद शहा तुराबुल हक् यांनी समर्थ रामदास यांच्या दासबोध या ग्रंथाचे उर्दुत भाषांतर केले. त्यांच्या मनाच्या श्लोकांना त्यांनी ***मनसमझावन*** असे नाव दिले. गेल्या ३५० वर्षापासून फेब्रुवारी या महिण्यात या दर्ग्यात उरुस (यात्रा) भरते. सर्व धर्म समभावाचे एक उत्तम प्रतिक म्हणजे हा उरुस यात्रा महोत्सव आहे..

परभणी तालुक्यात नागझरी हे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाते झरी या गावा पासून १ कि.मी. अंतरावर असलेल्या ठिकाणी पाण्याचा अखंड झरा वाहतो. झ-याचा उगम कोठून होतो हे आजपर्यंत कोणालाही समजले नाही. भाविकभक्तांची मात्र अशी श्रद्धा आहे की, हे पाणी औंढा नागनाथ येथून या झ-यात गुप्त मार्गाने येते. पुर्वी हा परिसर वनराईने समृद्ध होता. आज मात्र झाड म्हणण्याजोगे एक उमराचे तेवढे येथे दिसून येते. या उमराच्या मुळीचेही येथे महत्व असून भाविकभक्त या मुळीची व झाडाचीहि पुजा करतात. मुळीतून पलिकडे गेल्यास आपले दुःख दुर होते असा येथिल भाविकांचा विश्वास आहे. येथे कोणतेही मंदिर नसताना गोमुखातून सतत पाण्याची धार सुरु असते. त्या धारेखाली स्नान केल्यास अनेक रोगांपासून मुक्ती मिळते. असे ही येथील भाविकांचे म्हणणे आहे.

परभणी पासून केवळ १२ कि.मी. अंतरावर त्रिधारा नावाचे श्री क्षेत्र आहे. तीन नद्यांच्या संगमामूळे यास त्रिधारा म्हणतात. नद्यांच्या संगमावर ओंकारेश्वर, दत्तात्रय, दुर्गा, भगवती आणि हनुमान यांची मंदिरे आहेत. जवळच नदीकाठी उमराच्या झाडाखाली श्री दत्तात्रयाच्या मुर्तीची स्थापना केली आहे. देवळातील हनुमानाची मुर्ती भव्य आहे. परभणी पासून दक्षीणेस सुमारे १९ कि.मी. अंतरावर पोखर्णी येथे नृसिंह मंदिर आहे. डाव्या बाजुला तीन फुट उंचीची श्री ची मुर्ती आहे. या मुर्तीवर चांदीचे आवरण आहे. मंदिराच्या मध्यभागी भगवान शंकराची पिंड आहे. हे शिवलिंग जमिनीच्या सुमारे १.५ मि. खाली आहे. वैशाख शु. पोर्णिमेला नृसिंहाची यात्रा भरते.



Scanned with OKEN Scanner

**मानवत -**

तालुक्याचे हे मुख्य ठिकाण आहे.कापडाची हि मोठी बाजारपेठ आहे. हातमाग व यंत्रावर येथे त-हेत-हेची लुगडी, कापड व खण तयार केले जातात. गावात जाड्या मारोतीचे प्रसिद्ध मंदिर आहे. मंदिरातील मुर्ती शिल्पाच्या दृष्टीने अतिषय सुंदर मुर्ती आहे. देवळाच्या चारही बाजुला मनोरे आहेत आणि प्रत्येक बाजुला हत्तीचे शिल्प आहे. मारुतीची मुर्ती संपुर्ण काळ्या दगडातील असून ती एका चौथ-यावर आहे. याशिवाय येथे माहुर देवी मंदिर , राम मंदिर, उभ्या महादेवाचे मंदिर, विठ्ठल मंदिर, वली बाबाची कबर, चंदनेश्वर मंदिर व बडी मशिद ईत्यादी ऐतिहासिक वारसा स्थळे प्रसिद्ध आहेत.

**गंगाखेड -**

हे गोदावरी काठावर वसले असून तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे.दक्षीण काशी या नावाने ओळखले जाते. बरीच देवळे व गोदावरी नदीचा सुरम्य परिसर यामुळे गावाला विशेष सांस्कृतिक महत्व प्राप्त झालेले आहे. गंगाखेड हे गाव निजामाचे एक सरदार राजे राजेंद्र रघुत्तमराव यांच्या जहागिरीचे मुख्य ठिकाण होते. त्यामुळे गावाभोवती असलेले तटाचे अवशेष आजही नजरेत भरतात. येथील राजवाडा दगडाचा बांधलेला असून तो अतिशय भक्कम आहे.ती पुण्याच्या शनिवारवाड्याची प्रतिकृती आहे असे म्हणतात. पाणवेस व कंधार वेस अजुनही शाबुत आहेत.प्रसिद्ध संत जनाबाईची समाधी येथे आहे.गंगाखेडला जो सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे, त्यात संत जनाबाईना मोठे मानाचे स्थान आहे. गंगाखेड शहराच्या बाहेर गोदावरी नदीला ज्या ठिकाणी कपिला नदी मिळते तेथे त्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे. ३०० वर्षापुर्वी आनंदस्वामींनी स्थापन केलेले येथील बालाजी मंदिर प्रसिद्ध आहे. याशिवाय येथे महातपुरी वेशीचा मारुती, राधाकृष्ण मंदिर, गुम्माहालिंग स्वामी शिवाचार्य मठ, शनि-मारुती मंदिर, नृसिंह मंदिर, मध्व संप्रदायाचे मधू मंदिर, आर्य वैश्य समाजाचे नगरेश्वर मंदिर, तिलोत्तमा मंदिर, मेहबुब सुभानो दर्गा व अफगाणी काका समाधी इ. एतिहासीक स्थळे प्रसिद्ध आहेत.

**चारठाणा -**

जिंतुर तालुक्यात हे गाव शयना नदीच्या काठी असून येथे प्राचीन महादेव मंदिर, दगडी झुलता मनोरा (स्तंभ) असून हा स्तंभ गावाचे वैभव आहे. दगडी बांधणीच्या यादव कालीन शिल्प कलेने नटलेल्या या गावाचे हेमाडपंती स्थापत्य कलेच्या दृष्टीने अत्यंत महत्व आहे. चारठाणा येथे ३६५ महादेवाची मंदिरे होती, परंतु सध्या ते अस्तित्वात नाहीत, नामशेष झाली आहेत. याशिवाय येथे दगडी गंगाळ (मोठी बारव) असून तिच्या खालून औंढ्यापर्यंत एक भुयार आहे, सध्या ते बुझवले आहे. हे प्रसिद्ध आहे.

**जांभुळबेट -**

गंगाखेड पासून २२ कि.मी. अंतरावर हे ठिकाण आहे. महादेवाच्या दर्शनासाठी गोदावरीचे पात्र पार करुन जावे लागते. हे ठिकाण पालम तालुक्यात असून गोदावरीच्या पात्रात हे सुंदर बेट तयार झाले आहे. बेटावर जांभळाची झाडे आणि मोरांची संख्या जास्त आहे. येथील महादेवाचे हेमाडपंथी मंदिर प्रेक्षणीय आहे. हे बेट पर्यटन केंद्र म्हणून विकसीत होण्यास बराच वाव आहे.

**सोनपेठ -**

सोनपेठ हा नवा तालुका असून गंगाखेड पासून २४ कि.मी. अंतरावर वाण नदीच्या पुर्व किना-यावर बसले आहे. सोन्याची बाजारपेठ, शाक्त पंथाच्या योगानंद स्वामींची समाधी, लहानशा शहरात सोळा मंदिरे, सहा मठ, सात मस्जिद व दोन धर्मशाळा आहेत. चांद शाहवल्ली (पीर) ची समाधी आहे. वाण नदीच्या काठी हे असून तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे.

**पालम -**

हे ही तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे.पालम तालुक्याच्या पुर्वेकडे ८ कि.मी. अंतरावर फळा या गावी संत मोतिराम महाराज (बनवसकर) यांची समाधी आहे. २७ ऑगष्ट १९६४ रोजी संत मोतीराम महाराज यांनी समाधी घेतली असून या ठिकाणी १११ फुट उंचीच्या मंदिराची उभारणी चालू आहे. या मंदिराच्या कळसावर ७२ देवी देवतांच्या मुर्ती बसवण्यात आल्या आहेत. संत मोतीराम महाराज यांचा परिसरात फार मोठा वारकरी संप्रदाय आहे.

**सेलू -**

हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या चळवळीचे एक मुख्य केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. येथील अनेक स्वातंत्र सैनिक महाराष्ट्रास परिचीत आहेत. एक मोठी व्यापारी पेठ आहे. तसेच सांस्कृतिक चळवळीचे केंद्र म्हणून सुद्धा सेलू परिचीत आहे. सेलू तालुक्यातील वालुर येथे वाल्मिकेश्वर मंदिर आहे पण हे मंदिर तर नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. तसेच मनमाड काचीगुडा लोहमार्गावरील हे एक स्थानक आहे. संत साईबाबाचे गुरु संत श्री बाबासाहेब महाराज यांची समाधी येथे आहे.

**पाथरी -**

हे ही तालुक्याची मुख्य ठिकाण येथूनच देवनांद्रा येथे साखरकारखाना आहे. पाथरी तालुक्यातील वझुर खुर्द येथील बल्लाळेश्वर हे मंदिर तर नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. शिर्डीच्या साईबाबाचे जन्मस्थान म्हणून हे ठिकाण प्रसिद्ध आहे. साईबाबाचे पुर्ण नाव नारायण आण्णासाहेब भुसारी होते असे म्हणतात. पाथरी हे गाव प्राचीन असल्याची ग्वाही येथील जुना किल्ला देतो. हा किल्ला अर्जुनाचा असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. पार्थपुरी हे पाथरीचे प्राचीन नाव आहे. संत श्रीधर यांनी याच ठिकाणी अश्वमेध ग्रंथ लिहिल्याचे म्हटले जाते.

**जिंतूर -**

प्राचीन काळचे जैनपूर म्हणजेच आजचे जिंतुर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून जैनपूर नावाप्रमाणेच जवळच गुहांमध्ये कोरलेल्या जैनशिल्पांमुळे विशेष प्रसिद्धीस आले आहे. जिंतुरलगतच्या डोंगरात एकुण सहा लेणी आहेत. त्या प्रामुख्याने आदिनाथ,



Scanned with OKEN Scanner

शांतिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ, नंदिश्वर शकुट व बाहुबली भगवान अशा आहेत. घुमटाची बांधणी चार स्तंभाच्या सहाय्याने केली आहे. जैनांच्या पवित्र स्थळामुळे येथे भाविकांची नेहमीच वर्दळ असते.पवित्र लेणीत पादत्राने घालून प्रवेश केल्यास मधमाशा त्याचा पाठलाग करतात अशी अख्यायिका असल्यामुळे सर्व भाविक अनवाणी पायाने लेण्यात प्रवेश करतात.मधमाश्या त्यांना चावत नाहीत असे म्हणतात.

शेजारीच असलेल्या एका टेकडीवर मजबुत दगडात बांधलेला एक किल्ला आहे. याला जिंतूरचा किल्ला असे म्हणतात.किल्ल्याच्या परिसरात काही गुंफा आहेत.प्रवेशासाठी मजबुत लोखंडी दरवाजा आहे.दरवाजावर एक कमान आहे व कमानीवर एक घुमट आहे. प्रवेशद्वार ओलांडल्यावर एक चौकोनी पटांगण लागते. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजुला पाच खोल्या असून उजव्या बाजूला असलेल्या विहीरीवर दोन खोल्या आहेत. किल्ल्याचा आकार चौकोनी असून चारही बाजूस बुरुज आहेत. यापैकी एका बुरुजाखाली प्रवेशद्वार आहे. याशिवाय महावीर दिगंबर जैन मंदिर, जुने महावीर दिगंबर जैन मंदिर, मिक्षीण साहेबाचा दर्गा, सय्यद उल कादरी दर्गा व सोमेश्वर लिंग हि ऐतिहासिक वारसा स्थळे हि प्रसिद्ध आहेत.

**राणीसावरगाव -**

येथे रेणुकामातेचे जागृत स्थान व केदारेश्वराचे मंदिर आहे तसेच गौतमी नदीचे उगमस्थान पण आहे. गौतमी ऋषीच्या चरणस्पर्शाने पावन झालेले हे स्थान आहे. गावातून वाहना-या या गौतमी नदीमुळे गावाचे दोन भाग झाले असून पश्चिम भागात सावरगाव पेठ तर पुर्वे कडील भागास रेणूकादेवी पेठ असे म्हणतात.रेणुकादेवी अनेकांचे कुलदैवत आहे.दरवर्षी येथे नवरात्रोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. रेणुका देवी मंदिराच्या आजुबाजुस अनेक देवळे आहेत.त्यात गणपती, जोगाई व दत्त मंदिर ही महत्वाची ठिकाणे आहेत. दत्त मंदीर हेमाडपंती असून दत्त जयंतीला येथे मोठा उत्सव साजरा केला जातो.

**निष्कर्ष -**

१) पर्यटन हा मानवाचा वैशिस्ट्यपुर्ण आर्थिक व्यवसाय आहे.
२) पर्यटन हा विना मोबदला अविष्कार आहे.
३) पर्यटन हा एक व्यवसाय असला तरी, तो एक सेवा व्यवसाय आहे.
४) पर्यटनामुळे संशोधनास चालना मिळते.
५) पर्यटनामुळे भिन्न विभिन्न समाजातील लोकांचा संपर्क निर्माण होतो.
६) पर्यटनामुळे वेगवेगळ्या देशातील लोकांची देवाणघेवाण वाढते.
७) पर्यटनामूळे राष्ट्रीय एकात्मतेस चालना मिळते.
८) पर्यटनामुळे वैचारीक देवाणघेवाण होते.
९) पर्यटनामुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढवण्यासाठी मदत होते.
१०) पर्यटनामुळे ऐतिहासीक वारसा स्थळे टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.
असे मला वाटतेईत्यादी.

**संदर्भग्रंथ सुची**

१) रा. नी. देशमुख - आपला परभणी जिल्हा
कल्पना प्रकाशन, नांदेड. २०१२

२) डॉ. आर एस कोंडेकर - पर्यटन
अरुणा प्रकाशन, लातूर २०१८

३) डॉ. कठारे/डॉ. साखरे/ डॉ. पाटील - वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन
विद्या बुक पब्लीशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद. २०१५

४) डॉ अनिल कठारे, डॉ. एन.एन. नगराळे - मराठवाड्याचा इतिहास
कल्पना प्रकाशन, नांदेड. १९९९

५) डॉ. किरण देशमुख - असाही मराठवाडा
निर्मल प्रकाशन, नांदेड. २०१२

६) डॉ. सोमनाथ रोडे - मराठवाड्याचा इतिहास
विद्या बुक पब्लीशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद. १९९९

७) अरुणचंद्र पाठक - मराठवाडा एक शोध
सुमेरु प्रकाशन, डोंबिवली (पुर्व). २००९



Scanned with OKEN Scanner